# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 06/05/2020 (बुधवार)

(दुपार)

### चोरी

1) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावर मौजा गोंडखैरी बरड शिवार येथे दिनांक 05/05/2020 चे 12.00 वा. दरम्यान आरोपी क्र. 1) मारोपी पांडु कुऱ्हाडे, वय 22 वर्ष, रा. दुर्ग धामणा, 2) संजय रामा लष्कर, वय 36 वर्ष, रा. एमआयडीसी सुप्रिम कॉलनी जळगाव ह.मु. दुर्ग धामणा यांनी संगनमत करून फिर्यादी नामे– यारेलाल पुंजीलाल मारवाडी, वय 35 वर्ष, रा. गोंडखैरी बरड, ता.कळमेश्वर यांच्या शेताचे एरीकेशन करीता शेताजवळील नदीत लावलेले होन्डा डब्लुबीके 30 जनरेटर कि. 29,000/–रू. चोरी करून घेवुन जात असता शेत शेजारील लोकांनी व फिर्यादीने दोन्ही आरोपीतांना पकडून वरील मुददेमाल सह पोलिस स्टेशन कळमेश्वर येथे हजर येवुन फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ दिलीप सपाटे 9823998476 हे करीत आहे.

2) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर मौजा आमगाव शिवार येथे दिनांक 05/05/2020 चे 04.30 वा. दरम्यान आरोपी क्र. 1) प्रशिल सुभाष बोपचे, मु. आमगाव, वय 19 वर्ष व 2) प्रणय कालुजी चोले, दोन्ही रा. आमगाव यांनी संगनमत करून फिर्यादी नामे– श्री दिपक बाबुसिंग चव्हान, वय 53 वर्ष, रा. परसोडी (पेठ) यांचे मौजा आमगाव शिवारातील फिश पॉट येथील टाक्यातील प्लास्टीक (पी लाईन) कि. 25,000/–रू. चे चोरून घेवुन जातांना फिर्यादीस मिळुन आल्याने फिर्यादी यांनी आरोपी व चोरीस गेलेला माल ताब्यात घेवुन पो.स्टेला हजर येवुन रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नायक मनिराम नेवारे 952760701 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर